आर.सी.सी क्र. १५२६/२०१८
सरकार विरुध्द दिलीप
**निशाणी क्र. १७/ क**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक १ यांची –**
**दिनांक २३.०२.२०२३.**
**उलटतपासणी शपथेवर सुरू आरोपी पक्षा तर्फे श्री. ए. के. ठाकरे, विधीज्ञ यांचे मार्फत–**

२. जात पडताळणीसाठी संस्थेचा संबंधीत व्यक्ती बोलविण्यात आलेला नव्हता. आरोपीचे जात प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले होते. आमच्या निवडीच्या प्रक्रियेमध्ये जे निकष होते त्या निकषामध्ये आरोपी पात्र होता. अनुसूचित जातीच्या परिशिष्टांमध्ये कोणत्या जातीचां समावेश आहे हे मला माहीत आहे. आरोपी आजही आमच्या संस्थेमध्ये कार्यरत आहे. आरोपीस संस्थेने दिनांक २१.१०.२०१५ रोजीचा शासन निर्णय अन्वये अजुनही कार्यरत ठेवलेले आहे. मी जात प्रमाणपत्राची वैयक्तीक पडताळणी केलेली नाही. आमच्या संस्थेवर वकीलांची नेमणूक केलेली आहे. हे म्हणने खरे नाही की, दिनांक १०.०२.२०१७ रोजीचा जात पडताळणी समितीचा आदेश पडताळणी न करता गुन्हा नोंदविलेला आहे. आरोपीने मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचीका दाखल केलेली आहे याबाबत मला माहीती नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक १२.०४.२०१७ रोजी सदर याचीकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने आरोपी विरोधात कोणतीही कठोर कारवाई करू नये, असे आदेश दिलेले आहेत. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने सदर जात पडताळणी समितीचे निकाला विरोधात मा. उच्च न्यायालयात जाणार आहे याची कल्पना मला दिलेली होती. हे म्हणने खरे नाही की, तरी देखील मी आरोपी विरोधात खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

३. आमच्या संस्थे अंतर्गत कर्मचा–यांची युनियन नाही परंतू शासकिय संघटना आहेत. हे म्हणने खरे नाही की, आरोपीचा व माझा सुट्टी घेण्यावरून वाद झालेला होता. हे म्हणने खरे नाही की, त्याचा राग मनात धरून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, हे मी खोटे सांगतो की, मी आरोपीचे विरोधात जात पडताळणी समितीच्या आदेशान्वये फिर्याद दाखल केलेली

आहे. हे म्हणने खरे नाही की, जात पडताळणी समितीचा निकाल मी पाहिलेला नाही व त्याची पडताळणी केलेली नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने कोणतेही जातीचे खोटे प्रमाणपत्र काढलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा सांगीतलेला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**

( श्री. एम. आर. देशपांडे )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक- २३/०२/२०२३.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.

**स्वाक्षरीत/-**

( श्री. एम. आर. देशपांडे )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद